# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०१/१२/१७
## दि.०१/१२/१७ रोजी दु.१२/०० वा.ते २२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ३७७/१७,भादविक ३०७,३२४,५०४,१४३,१४७,१४८,१४९,आर्म ॲ.क. ३(२५) सह १३५ |
| **फिर्यादी** | अजय वाघ,वय १८ वर्षे,रा.वडगांव बु//,पुणे |
| **आरोपी** | दहा अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/११/२०१७ रोजी १५/३० वा.ते १६/४५ वा.चे दरम्यान जिजाऊ बहुउदेशीय केंद्र येथुन हिंगणेकडे बंद पाईपलाईनचे बाजुने जाणारे नवीन रोडचे कडेला झाला खाली, वडगांव बु//पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचा आतेभाऊ विनोद फड, व मित्र गणेश म्हसकर, असे विनोद फड चालवित असलेल्या व्हॅनमध्ये बसुन गप्पामारत असताना, एका मोटार सायकलवरील तीन इसम त्यांचेकडे पाहत जात असताना फिर्यादी व त्यांच मित्र त्यांचेकडे पाहत होते. त्यावेळी सदरचे तिघेजन गाडी वळवुन फिर्यादी यांचेकडे आले व म्हणाले तुम्हाला मस्ती आली आहे काय आम्हाला खुन्नस देता का असे म्हणुन शिवीगाळ केल्याने त्यांच्यात बाचाबाची झाली. त्यावेळी फिर्यादी यांचा आतेभाऊ विनोद याने भांडणे सोडविली त्या नंतर ते निघुन गेले. व फिर्यादी व त्यांचे मित्र गाडीमध्ये गप्पा मारीत बसले असताना त्यांचा अजुन एक मित्र विजय चिंचवडकर हा देखील त्यांचे सोबत गाडीत गप्पा मारीत बसला त्यानंतर सायं.१६/४५ वा.चे सुमारास पाच मोटार सायकलवरुन आलेल्या दहा इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचा मित्र गणेश म्हसकर, याला हाताने माराहाण करु लागले. त्यावेळी फिर्यादी हे घाबरुन पळत असताना एका इसमाने फिर्यादी यांच्या पाठीत कोत्याने मारल्याने फिर्यादी हे किरकोळ जखमी होवुन फिर्यादी यांचे अंगातील शर्ट फाटला त्यानंतर फिर्यादी हे घरी गेल्यावर त्यांचा आतेभाऊ विनोद याचे मोबाईलवरुन विजय चिंचवडकर याने फिर्यादीस सांगितले की तुला मारहाण करणाऱ्या इसमांपैकी एकाजणाने विनोद च्या डोक्यात कोयता मारला असता विनोदने डाव्या हाताने अडविण्याचा प्रयत्न केला आता त्या इमाने विनोदच्या डाव्या हाताचे पंजावर, मनगटावर, डाव्या पायाच्या नडगीवर वार करुन त्यांस गंभीर जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. व मारुती व्हॅनच्या काचा फोडुन गाडीचा दरवाजा चेंबवुन नुकसान करुन पळुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एम.साळुंखे ९५५२८३५३९९ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ६७९/१७,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | आर.जी.टिळेकर,पो.हवा.वाकड पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)जितेंद्र वाधवाणी, २) सय्यद नबिलाल नायकवडी, ३) शब्बीर बागवाण, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/११/२०१७ रोजी १२/३० वा.चे सुमारास लेमर बांधकाम साईट जिंजर हॉटेल पाठीमागे ताथवडे पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसमांनी ठेकेदाराने त्याचे पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना, कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी |

बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार मयत महिला लक्ष्मी शिवराय पुजारी,वय ४५ वर्षे,रा.बिजलीनगर चिंचवड,पुणे ही इमारतीचे सहाव्या मजल्यावर सिमेंट खडी, वाहुन नेण्याची ट्रॉली मिक्सरवर पडुन नंतर मजुर महिला नामे लक्ष्मी पुजारी हिचे अंगावर पडुन ती गंभीर जखमी होवुन,तो डॉक्टर तपासणीपुर्वीच मयत झाली आहे. पो स्टे अ.मयत रजि.नं. /१६,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करून सदरचा गुन्हा दाखल केला आहे

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. एस.जे.गोडे ९७६२२२०४२४

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**